कृषि विद्यापीठ व सलग्न संस्था यांनी
कार्यालयीन खरेदीच्या कार्यपध्दती बाबत.

## डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापिठ,अकोला
## अर्थ प्रशासन विभाग

वाचा : १) शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र.भांखस-२०१४/ प्र.क्र. ८२ / भाग-III/ उद्योग-४, दि.३० ऑक्टोंबर, २०१५.
२) कार्यकारी परिषद ठराव क्र. काप/३२/२०१६, दि.०८ जुलै २०१६.

### परिपत्रक

अप्रवि/अंदाज/ कार्या. खरेदी/२०१६-१७/695 / दि.२५ /०७/२०१६

शासनाने उपरोक्त शासन निर्णय दि.३० ऑक्टोबर, २०१५ अन्वये रु.५,००० ते ३,००,०००/- पर्यंत खरेदी दरपत्रक मागवून (खुली स्पर्धात्मक निविदा न मागविता खरेदी करण्याची ) सर्व विभागांना मुभा देण्यात आलेली आहे. तसेच रु.३.०० लक्ष पर्यंतची कोणत्याही वस्तूंची खरेदी DGS & D कडील दरकरारच्या आधारे करण्याची सबंधीत विभागांना मुभा देण्यात आलेली आहे.

निविदा प्रक्रियेत खरेदी किंमत रुपये ३.०० लक्ष पेक्षा अधिक असेल तेव्हा ई-निविदा प्रणालीचा वापर करणे बंधनकारक राहिल.

प्रशासकीय विभाग / कार्यालय प्रमुखांनी त्यांना प्रचलित असलेल्या वित्तीय मर्यादेपर्यंत प्रशासकीय मान्यता देण्याचे वित्तीय अधिकार राहतील.

वित्त विभागाकडून कोणत्याही प्रकारची खरेदी देयकांच्या रकमा १५ मार्च नंतर मंजूर करण्यात येणार नसल्याने प्रत्येक खरेदीदार विभागाने आवश्यक त्या वस्तुंची खरेदी वित्तीय वर्षाच्या १५ फेब्रुवारी पूर्वीच होईल अशा प्रकारे खरेदी प्रक्रिया राबवावी. तसेच भविष्यात आवश्यकतेनुसार खरेदी संबंधीत वित्तीय अधिकार नियमाबाबतचे बदल वेळोवेळी निर्गमीत करण्यात येतील.

या परिपत्रक दिनांकापासून उपरोक्त कार्यप्रणालीचा अवलंब करण्यात यावा.

मा. कुलगुरु यांच्या मंजुरीने.

नियंत्रक
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ
अकोला

प्रतिः
१) नियंत्रण अधिकारी (सर्व )________
२) विभाग प्रमुख (सर्व)________
३) आहरण व संवितरण अधिकारी (सर्व )________
४)सहयोगी अधिष्ठाता, कृषि महाविद्यालय, ________
५) सदस्य सचिव, केंद्रीय खरेदी समिती, डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला.
६) विद्यापीठ अभियंता, डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला.
यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता अग्रेषित.